# Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar

# Date – 16 March 2024

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

# प्रादेशिक बातम्या

# दिनांक १६ मार्च २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम निवडणूक आयोग आज दुपारी जाहीर करणार
- शेतकऱ्यांचे एक लाख ६० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ-मुख्यमंत्र्यांची घोषणा
- राज्यातल्या सर्व शिक्षकांना गणवेश बंधनकारक;विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शनिवार उपक्रम
- राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचा समारोप;मुंबई विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतेपद

आणि

- उडान योजनेअंतर्गत नांदेड इथली विमानसेवा येत्या ३१ मार्चपासून पूर्ववत

****

आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोग आज जाहीर करणार आहे. आज दुपारी नवी दिल्लीत होणारी ही पत्रकार परिषद समाजमाध्यमांवर थेट प्रसारित करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक आयोगानं ट्वीटरवर दिली आहे.

दरम्यान, स्टेट बँकेनं निवडणूक रोख्यांबाबत दिलेली माहिती अपुरी असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. याबाबत रोख्यांच्या क्रमांकांची सविस्तर माहिती सोमवारपर्यंत द्यावी, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत.

****

आगामी लोकसभा निवडणूक आपण प्रकृती अस्वास्थ्यामुळे लढवणार नसल्याचं माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी स्पष्ट केलं आहे. काल मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर इथं पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. आपल्या कन्या रोहिणी खडसे यासुद्धा निवडणूक लढवणार नसल्याचं खडसे यांनी नमूद केलं.

****

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा काल पालघर जिल्ह्यात मोखाडा-जव्हार-विक्रमगड-वाडामार्गे ठाण्याला पोहोचली. तत्पूर्वी पालघर जिल्ह्यात वाडा इथं सभेला संबोधित करताना गांधी यांनी, देशातल्या गरीब जनतेवर आणि तरुणांवर अन्याय होत असल्याचं सांगून केंद्र सरकारवर टीका केली.

****

शेतकऱ्यांच्या एक लाख ६० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जासाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. बीड जिल्ह्यातल्या किसान क्रेडीट कार्डचा डिजीटल प्रकल्प, जनसमर्थचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातल्या २२ शेतकऱ्यांच्या खात्यात किसान क्रेडीट कार्डच्या माध्यमातून थेट रक्कम जमा करण्यात आली. या जनसमर्थ प्रकल्पासाठी बीड जिल्ह्यातील महसूल आणि कृषीसह विविध विभागांनी आतापर्यंत पावणे पाच लाख शेतकऱ्यांची नोंदणी केली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्याला कागदपत्र विरहीत आणि घरबसल्या अल्पमुदतीच्या कर्जासाठी अर्ज करता येतो.

**

दरम्यान, धाराशिव इथल्या नियोजित ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आलं. आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यावेळी उपस्थित होते. या जिल्हा रुग्णालयामुळे जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा मिळतील असा विश्वास सावंत यांनी व्यक्त केला.

****

दरम्यान, मुंबईत वरळी इथं आकांक्षित महिला सक्षमीकरण योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांनी काल केला. राज्यात दोन कोटी पेक्षा जास्त महिलांना बचत गटांशी जोडण्यात येईल, असं प्रतिपादन त्यांनी केलं. गर्भलिंग निदान प्रतिबंध तसंच लिंग

गुणोत्तर प्रमाण वाढवण्यासाठी, सार्वजनिक आरोग्य विभागाने विकसित केलेल्या `आमची मुलगी` संकेतस्थळाचं उद्घाटनही मुख्यमंत्र्याच्या हस्ते काल करण्यात आलं.

****

एस.टी महामंडळाच्या एलएनजी इंधनावरील वाहन रुपांतर प्रकल्पाचं, काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन झालं. महामंडळाच्या एकूण खर्चापैकी सुमारे ३४ टक्के खर्च हा डिझेलवर केला जातो. तो कमी करण्यासाठी महामंडळातील सर्व वाहनं एलएनजी इंधनावर रुपांतरित करण्यात येणार आहेत.

****

आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेअंतर्गत राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान निधी अकरा हजार रुपयांवरून वीस हजार रुपये करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. थेट लाभ हस्तांतरण योजनेनुसार सन्माननिधीची रक्कम संबंधित पत्रकारांच्या बँक खात्यात जमा होईल.

****

“जलसंधारण अधिकारी-गट ब अराजपत्रित” पदासाठी २० आणि २१ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या परीक्षेत अमरावती इथं गैरप्रकार झाल्याचं आढळून आलं होतं.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी सर्व नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे....

****

शालेय विद्यार्थ्यांप्रमाणे आता राज्यातल्या सर्व शिक्षकांना विशेष गणवेश लागू करण्यात येणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी काल मंत्रालयात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. डॉक्टर वर्गाप्रमाणे यापुढे सर्व शिक्षकांना आता त्यांच्या नावापुढे टीआर अशी पदवी लावता येणार असल्याचं केसरकर यांनी सांगितलं.

दरम्यान, राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातल्या प्रत्येक शनिवारी ‘आनंददायी शनिवार’ हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वर्तन आणि

जबाबदारीबाबत जागरूकता निर्माण व्हावी, सहकार्यवृत्ती तसंच नेतृत्व गुणांचा विकास व्हावा, या हेतूने हा उपक्रम राबवला जाणार आहे.

****

राज्यात इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी ही माहिती दिली. राज्यात नव्याने स्थापन केलेल्या विविध महामंडळाच्या उपकंपनी, नवीन कार्यालयं आणि त्याअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या पोर्टलचं उद्घाटन सावे यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. इतर मागास प्रवर्गातील समाजाचा सामाजिक आणि आर्थिक विकास व्हावा तसंच विविध क्षेत्रातील स्वयंरोजगाराला चालना मिळावी, या उद्देशानं हा निर्णय घेतल्याचं, सावे यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित, एकोणीसाव्या राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचा काल समारोप झाला. प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी या समारोप सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. युवकांनी स्वतःला ओळखावं आणि कोणाला हरवण्यापेक्षा कलेतला आनंद जाणून घ्यावा, असा सल्ला, त्यांनी युवकांना दिला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर विजय फुलारी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पाच दिवस चाललेल्या या महोत्सवात २४ विद्यापीठांच्या आठशे पंचाहत्तर विद्यार्थ्यांनी तीस कला प्रकारात आपली कला सादर केली. मुंबई विद्यापीठाने २० पारितोषिकं मिळवत सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'उडे देश का आम नागरिक' अर्थात उडान या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत नांदेड इथून विमानसेवा पूर्ववत होत आहेत. नांदेड-हैद्राबाद आणि नांदेड-अहमदाबाद ही दोन विमानं ३१ मार्चपासून नियमितपणे सुरू होणार असून, बंगळुरू-नांदेड-जालंदर विमानसेवाही लवकरच सुरू होणार असल्याची माहिती खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली.

****

लोकसभा निवडणुकीत दिव्यांगांची टक्केवारी आणि सहभाग वाढवण्यासाठी परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीनं काल दिव्यांग मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली. या चित्ररथाला जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं.

****

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी नांदेड इथं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी जिल्हा स्विप कक्षाची स्थापना केली आहे. या कक्षाच्या वतीनं विविध तालुक्यात मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृती केली जात आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या धार्मिक तसंच ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या विकास आराखड्यास मंजुरी मिळावी अशी मागणी पर्यटन जनजागृती संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. धाराशिव इथं पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे काल याबाबतचं निवेदन सादर करण्यात आलं.

****

नांदेड इथं ट्रक आणि दुचाकीच्या धडकेत काल पितापुत्रांचा मृत्यू झाला. आसना नदीच्या पुलावर हा अपघात घडला, या दोघांना जखमी अवस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात नेलं असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं.

****

अंबाजोगाई इथल्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील अधिकाऱ्यांची निवासस्थानं आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी राज्य सरकारने १०२ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. या निवासस्थानांच्या बांधकामाला लोकसभा निवडणुकीनंतर सुरुवात होणार असल्याची माहिती आमदार नमिता मुंदडा यांनी दिली आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने काल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी धाराशिव आणि तुळजापूर इथं आढावा बैठक घेतली. पेयजल पुरवठ्यासाठी जलस्रोत अधिग्रहणासह आवश्यक त्या उपाय योजना तातडीने राबवण्याच्या सूचना पाटील यांनी यावेळी केल्या.

****

नांदेड जिल्ह्यात काल नमो आत्मनिर्भर आणि सौरऊर्जा गाव अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी हिमायतनगर तालुक्यातील जवळगाव इथं भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं गेल्या महिन्यात नमो चषक २०२४ क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत ५१ क्रीडा प्रकारात ३७ हजारपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेतल्या विजेत्यांना तब्बल नऊ हजार पदकं प्रदान करण्यात आली.

****